# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**मध्यवर्ती कार्यालय, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल (पु) मुंबई - ४०० ००८**

**जाहिरात क्र. २/२०१९ सरळसेवा भरती वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील खाली नमुद केल्याप्रमाणे अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी (श्रेणी उन्नत) या पदांकरिता अर्हता पूर्ण करणा-या उमेदवारांकडून सामाजिक आरक्षणानुसार रिक्त जागा भरण्यासाठी ऑनलाईन (online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. **अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.**

उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी सदर जाहिरातीत देण्यात आलेली माहिती, सूचना, अटी व शर्ती इत्यादी काळजीपूर्वक वाचाव्यात.

**१) रिक्त पदांचा तपशील:**

| गट | अ.क्र. | संकेतांक क्रमांक | पदाचे नांव | | | रिक्त पदे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ जा | अ ज | वि.जा.व भ.ज. | | | | विमाप्र | इमाव | सा.व शै.मा.प्र | ईडब्ल्यु एस १०% | खुला | एकुण |
| | | | | | | अ | ब | क | ड | | | | | | |
| | | | **वर्ग-२ (कनिष्ठ ) अधिकारी** | | | | | | | | | | | | |
| अतांत्रिक | १ | ०१ | सहाय्यक वाहतूक अधिक्षक (कनिष्ठ) अधिकारी | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ | ६ |
| तांत्रिक | २ | ०२ | सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ)/ तांत्रिक सहाय्यक (कनिष्ठ) | ४ | ४ | ० | ० | ४ | ० | २ | ८ | १ | १ | ६ | ३० |
| तांत्रिक | ३ | ०३ | वरिष्ठ संगणित्र चालक (कनिष्ठ) अधिकारी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ | ४ |
| अतांत्रिक | ४ | ०४ | भांडार पर्यवेक्षक (कनिष्ठ) / वरिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ) | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | १ | ६ |
| तांत्रिक | ५ | ०५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (कनिष्ठ) अधिकारी | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ४ | ३ | १२ | २५* |
| तांत्रिक | ६ | ०६ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) (कनिष्ठ) अधिकारी | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ५ |
| | | | **एकूण** | **७** | **७** | **०** | **१** | **४** | **०** | **२** | **१३** | **९** | **८** | **२५** | **७६** |

* अपंगाचे आरक्षण :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदांत १ पद लोकोमोटीव्ह/सेरेब्रल पाल्सी (OA,OL) या अपंग प्रवर्गासाठी राखीव आहेत.

**२) समांतर आरक्षण :**

अ) महिलांसाठी आरक्षण: शासन नियमानुसार एकूण पदाच्या ३०% इतके समांतर आरक्षण राहील.

ब) **खेळाडू आरक्षण: राष्ट्रीय व आंतर राज्यस्तरावरील खेळाडूंकरिता ५% आरक्षण राहील.

क) अनाथ मुलांकरीता आरक्षण : शासन निर्णय, महिला व बाल विकास क्रमांक : अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ व शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र. संकिर्ण १११८/प्र.क्र.४६२/१६ - अ, दि.०४ डिसेंबर,२०१८ अनुसार अनाथ मुलांकरिता खुल्या प्रवर्गातून १ टक्का समांतर आरक्षण आहे.

उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील. तसेच समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या-त्या आरक्षणाच्या गटातून भरण्यात येईल.

**३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२.०२.२०१९ नुसार खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी १० % आरक्षण लागू राहील.**

**४) उपरोक्त पदांकरिता वेतनश्रेणी व आवश्यक शैक्षणिक अर्हता, इतर अटी व शर्ती**

**(3) शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता, अनुभव,वेतनश्रेणी, इतर अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, इतर अटी व शर्ती |
|---|---|---|
| १ | सहाय्यक वाहतूक अधिक्षक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम १ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु. ७६६०-२५०२०<br>ब) १ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु. ७७५०-२५९०७ | १)मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) वाहतूक क्षेत्रातील कामाचा २ वर्षाचा अनुभव<br>(रा.प. कर्मचा -यांसाठी केवळ सहा.वाह.निरिक्षक / वाहतूक निरिक्षक व वरिष्ठ कारकून, पदातील वाहतूक खाते / शाखेच्या कामाचा २ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) उमेदवार"एम.एस.सी.आय.टी." /तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा.<br>४) शारिरीक पात्रता :<br>ऊंची -१६३ सें.मी. (किमान )<br>(महिला उमेदवारांसाठी ऊंची १५३ सें.मी.)<br>५) रा.प. मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे परवाना सादर करणे आवश्यक. |
| २ | सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक (कनिष्ठ)/ तांत्रिक सहाय्यक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम १ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु. ७६६०-२५०२०<br>ब) १ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु. ७७५०-२५९०७ | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (३ वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) मोटार दुरुस्ती कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव.<br>(रा.प.कर्मचा-यांसाठी रा.प.कार्यशाळा/आगार कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) रा.प. मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे परवाना सादर करणे आवश्यक. |
| ३ | वरिष्ठ संगणित्र चालक(कनिष्ठ)<br>अ) प्रथम १ वर्षाकरीता (कनिष्ठ) वेतनश्रेणी.<br>रु.७६९०-२२१९१<br>ब) १ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.७७५०-२५९०७ | १) "मान्यताप्राप्त विद्यापिठाचा संगणकीय / माहिती व तंत्रज्ञान विषयातील पदवीधारक / समकक्ष पदवीधारक अथवा समकक्ष अर्हतेपेक्षा उच्च शैक्षणिक अर्हताधारक." |
| ४ | भांडार पर्यवेक्षक (कनिष्ठ) / वरिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ)<br>अ) प्रथम १ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु. ७६६०-२५०२०<br>ब) १ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.७७५०-२५९०७ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य वा विज्ञान शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>किंवा<br>ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका.(तीन वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) मोटारीचे सुटे भाग इ. भांडार सामान हाताळणे व त्याच्या नोंदी ठेवणे व खरेदी करण्याबाबतचा २ वर्षांचा व्यावहारिक अनुभव. |

| | | |
|---|---|---|
| | | (रा.प.कर्मचा-यांसाठी वरिष्ठ लिपिक पदातील भांडार खात्यातील कामाचा २ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) उमेदवार "एम.एस.सी.आय.टी."/ तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. |
| ५ | <u>कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम १ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.७६६०-२५०२०<br>ब) १ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.७७५०-२५९०७ | १) स्थापत्य अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (३ वर्षे मुदतीची) असणे आवश्यक. |
| ६ | <u>कनिष्ठ अभियंता (विद्युत) (कनिष्ठ)</u><br>अ) प्रथम १ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.७६६०-२५०२०<br>ब) १ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.७७५०-२५९०७ | १) विद्युत अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (३ वर्षे मुदतीची) असणे आवश्यक. |

**५) वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी पदासाठी इतर अटी व शर्ती :**

**(अ) <u>वयोमर्यादा</u> :-** संकेतांक क्रमांक १ ते ६ या पदांसाठी ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या दि. २०.०२.२०१९ रोजी किमान वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. शासकीय नियमानुसार मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथीलक्षम राहील. तसेच अपंग प्रवर्गातील उमेदवारांसाठी व खात्याच्या उमेदवारांसाठी कमाल वयाची मर्यादा ४५ वर्ष राहील.

**(ब) <u>ऑनलाईन परिक्षा</u>** :-

१)रा.प. महामंडळातील वर्ग -२ (वरिष्ठ) व (कनिष्ठ) ही पदे सरळ सेवेने पदे भरताना तोंडी परिक्षा (मुलाखत) न घेण्याबाबत निर्गमीत करण्यात आलेल्या शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं १२१४/प्र.क्र.(४३/१४) / १३-अ, दि.५ जून २०१४ नुसार फक्त ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेतील गुणवत्तेच्या आधारे सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन उमेदवारांची निवड वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी पदाकरीता कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरण्याच्या अधिन राहून निवड करण्यात येईल.

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्रक्र५८१ए/१८/ १६अ, दि.०५.१२.२०१८ व शासन शुध्दीपत्रक क्र. बीसीसी-२०१८/प्रक्र५८१अ २०१८/१६ब दि.१९.१२.२०१८ मधील सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) या प्रवर्गाकरीता विहित करण्यात आलेल्या आरक्षणाच्या तरतूदी तसेच शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१६/प्रक्र२२८ ए/१८/१६ब दि.०७.०१.२०१९ नुसार उमेदवारांची निवड वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी पदाकरीता कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरण्याच्या अधिन राहून निवड करण्यात येईल.

जाहिरातीमध्ये व रिक्त जागांमध्ये जरुर ते बदल करणे, आवश्यकता वाटल्यास जाहिरात पूर्णपणे अथवा अंशत: रदद करणे, निरनिराळया पदांकरिता प्रशिक्षण कालावधी विद्यावेतन निश्चित करणे यामध्ये आवश्यकता वाटल्यास उचित बदल करण्याचे अधिकार महामंडळास राहतील उमेदवारांच्या निवड प्रक्रिये मध्ये बदल करावयाचे कायदेशिर अधिकार महामंडळास राहतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**(क)** सर्व पदांकरिता उमेदवारांना मराठी बोलता, लिहीता व वाचता येणे अनिवार्य आहे.

**(ड)** महाराष्ट्र शाससन, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन पुरक पत्रक्र.मांतसं २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि. ४ फेब्रुवारी २०१३ व क्र.मांतसं २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.८ जानेवारी २०१८ अन्वये सर्व पदांकरिता उमदेवारांना MSCIT किंवा समकक्ष संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण प्रमाण पत्र असणे आवश्यक.

**(इ)** वरील सर्व अर्हता ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

**६) उमेदवारांची निवड व नेमणूक :-**

**अ)** (१) ऑनलाईन परिक्षेचे स्वरुप वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी राहिल. संकेतांक क्र.०१ ते ०६ करिता ऑनलाईन परिक्षा राहील.

**ऑनलाईन परिक्षा -** तांत्रिक व अतांत्रिक प्रवर्गातील उमेदवारांसाठी २०० गुणांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल, त्याकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण राहतील, या प्रमाणे २०० गुणांसाठी घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेचा कालावधी १ तास ३० मिनिट (९० मिनिट) असेल, वरील परीक्षेची प्रश्नपत्रिका हया बहुपर्यायी उत्तर असलेल्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या असतील. प्रत्येक प्रश्नास अधिका अधिका २ गुण ठेवण्यात येतील.

i) अतांत्रिक गटाकरिता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषया वरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण असून त्याप्रमाणे एकूण २०० गुणांची परिक्षा घेण्यात येईल.

ii) तांत्रिक गटाकरिता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बौध्दिक चाचणी व पदाशी संबधित विषया वरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ४० गुण असून त्याप्रमाणे एकूण २०० गुणांची परिक्षा घेण्यात येईल.

(२) ऑनलाईन परिक्षा उत्तीर्णतेसाठी किमान ३५% गुण आवश्यक. पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३०% गुणांपर्यंत शिथिलक्षम.

**ब)** संकेतांक १ ते ६ या पदाकरिता एक वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीपैकी पहिल्या सहा महिन्यांकरीता ज्या पदाकरीता त्याची निवड झाली आहे त्यापदाचे किमान मूळ वेतन (निम्नस्तर) विद्यावेतन म्हणून देय राहील व पुढील सहा महिन्यांच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये सदर पदाचे मूळ वेतन (निम्नस्तर) + अनुज्ञेय महागाई भत्ता विद्यावेतन म्हणून देय राहील. सदर प्रशिक्षण कालावधीमध्ये क्लासरुम प्रशिक्षणासह प्रत्यक्ष कामाच्या प्रशिक्षणाचा (On the job Training) समावेश असेल.

**क)** निवड झालेल्या उमेदवारांना महामंडळात प्रशिक्षण कालावधी सह किमान ५ वर्षे सेवा करणेबाबत हमी रु.१००/- किंमत असलेल्या मुद्रांक कागदावर महामंडळाने विहित केलेल्या प्रारुपात करारनामा करुन द्यावा लागेल. उमेदवाराने करार कालावधीच्या मुदतीपूर्वी नोकरी सोडल्यास करारात नमूद केलेली रक्कम रू.७०,०००/- (रू.सत्तर हजार फक्त) वसुल करण्यात येईल.

१. निवड झालेल्या उमेदवारांची रा.प.महामंडळातील कोणत्याही विभाग / घटकात / प्रदेशात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा रा.प.महामंडळाच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल.

२. सहाय्यक वाहततूक अधिक्षक, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक वर्ग-२ (कनिष्ठ) अधिकारी या पदातील निवड झालेल्या उमेदवारांना दोन वर्षात अवजड वाहन चालन परवाना प्राप्त करावा लागेल.

**ड)** संकेतांक क्रमांक **१** ते ६ या पदाकरिता एक वर्षाचे नेमणूकपूर्व प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना पदनिहाय दर्शविण्यात आलेल्या कनिष्ठ वेतनश्रेणीत १ वर्षा करीता नेमणूक देण्यात येईल. या कालावधीमध्ये मूळ वेतनासह नियमानुसार अनुज्ञेय असलेले भत्ते मिळतील. परिविक्षा कालावधी एक वर्षाचा राहील. एक वर्षाचा परिविक्षा कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्यानंतर त्यांना स्थायी करण्यात येईल. उमेदवाराने संबंधीत पदात

२ वर्षे (१वर्षे परिविक्षा कालावधी धरुन) समाधानकारक सेवा पूर्ण केल्यानंतर दुस-या वर्षी नियमित वेतनश्रेणीत सामावून घेण्यात येईल.

**इ)** आवश्यकतेनुसार उमेदवारांनी प्रशिक्षण / परिविक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण न केल्यास कालावधी वाढविणे अथवा काम समाधानकारकपणे न आढळल्यास पुढील नेमणूक नाकारण्याचा रा.प. महामंडळास अधिकार राहील.

वर नमूद केलेल्या बाबींमध्ये बदल करावयाचे पूर्ण अधिकार महामंडळास राहतील.

## **७) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व सूचना :---**

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | ०८-०३-२०१९ | ३१-०३-२०१९ रोजी रात्रौ ११.५९ पर्यत |
| २. | ऑनलाईन पेमेंट डेबीट कार्ड /क्रेडीट कार्ड नेट बँकिंगद्वारे स्विकारण्याचा कालावधी | ०९-०३-२०१९ | ३१-०३-२०१९ |
| ३. | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI ) यांच्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | ११-०३-२०१९ | ०३-०४-२०१९ बॅकेच्या कार्यालयीन वेळेपर्यत |
| ४. | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दिनांक ०६.०३.२०१९ पर्यंत शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठीस्टेट बॅन्क ऑफ इंडियाच्या शाखेकडून देण्यात आलेला Transation ID अर्जामध्ये नमुद करून ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | ०४-०४-२०१९ रोजी रात्रौ ११.५९ पर्यत | |
| ५. | **अर्जामध्ये दुरूस्तीसाठीचा कालावधी** :--. अर्जामध्ये ठराविक कालावधीमध्ये दुरूस्ती करण्यासाठी उमेदवाराला एकदाच संधी देण्यात येईल.त्यावेळी उमेदवार अर्जामध्ये दुरूस्ती करू शकतो. (याबाबत सविस्तर सुचना संकेतस्थळावर उपलब्ध होतील.) | ०४-०४-२०१९ | ०८-०४-२०१९ रोजी रात्रौ ११.५९ पर्यत |

**टिप :- अर्ज नोंदणी केल्यानंतर चलनामध्ये नमूद सुचनांनुसार बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावे.**

**भरती प्रक्रिया शुल्क :** सांकेतांक क्र.१ ते ६ या पदासाठी भरती प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे. सदरचे शुल्क खुल्या प्रवर्गाकरीता रु.१०००/- व मागास प्रवर्गाकरीता रु.५००/- असे राहील. तसेच बँकेचा आकार (बँक चार्जेस) उमेदवाराने स्वत: भरावयाचा आहे.

भरावयाच्या पदांचे एकुण ०६ प्रवर्ग असून त्यांचे पद सकेतांक क्र.०१ ते ०६ असे आहेत. तांत्रिक गटातील पदांचे संकेतांक क्रमांक २,३,५, ६ या प्रमाणे आहे. अतांत्रिक गटातील पदांचे संकेतांक क्रमांक १,४ याप्रमाणे आहे. तांत्रिकी व अतांत्रिक अशा दोन्ही गटातील पदांसाठी उमेदवार अर्ज करु इच्छित असल्यास प्रत्येक गटासाठी स्वतंत्र फी भरावी लागेल. एखाद्या उमेदवारास एकाच गटातील म्हणजे तांत्रिक किंवा अतांत्रिक यापैकी केवळ एकाच गटातील एका पेक्षा जास्त पदांसाठी इच्छुकता दर्शवावयाची असेल, तर तो प्राधान्य क्रमाद्वारे इच्छुकता दर्शवू शकेल. तथापि, जास्त पदात अर्ज केल्यानंतर त्याप्रमाणे लेखी परिक्षेत जरी उत्तीर्ण उमेदवार झाला तरी प्रत्यक्ष निवड एकाच पदासाठी केली जाईल. याकरीता उमेदवाराने जो प्राधान्य क्रम पहिल्या पदासाठी देण्यात आलेला आहे. तो विचारात घेण्यात येईल. प्रत्येक गटासाठीचे भरती प्रक्रिया शुल्क खुल्या प्रवर्गाकरिता रु.१०००/- व मागास प्रवर्गाकरिता रु.५००/- असे राहील. तसेच बॅंकेचा आकार (Bank Charges) / ऑनलाईन पेमेंट गेटवे चार्जेस उमेदवारांने स्वत: भरावयाचा आहे.

**तांत्रिक गटासाठी, अतांत्रिक गटासाठी परिक्षा घेण्यात येतील. उमेदवारांनी विशिष्ट गटातील पदांच्या निवडीचा प्राधान्यक्रम अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक राहील. प्राधान्यक्रमानुसार उमेदवाराची गुणानुक्रमानुसार एकाच पदासाठी निवड करण्यात येईल.**

**(८) <u>ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत :--</u>**

१) प्रस्तुत परिक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

२) उमेदवारांनी वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज www.msrtcexam.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

३) उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/ अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच, ई-मेल आयडी व मोबाईल संदेशवहनात येणा-या तांत्रिक अडचणींना रा.प.महामंडळ जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

४) उमदेवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पात्रतेनुसार संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व त्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमदेवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच,ऑनलाईन अर्ज भरून सर्व प्रक्रिया पुर्ण झाल्यावर व अर्ज ग्राहय (Validate) झाल्यानंतर उमेदवारांना अर्जातील भरलेल्या माहितीमध्ये कोणताही फेरबदल करता येणार नाही. उमेदवारांने ऑनलाईन अर्ज भरतांना जाहिरात काळजीपुर्वक वाचून, व अर्ज भरतांना दिलेल्या सुचना काळजीपुर्वक वाचुन अर्ज करणे आवश्यक आहे.लेखी परीक्षेचा निकाल उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना भरलेल्या माहितीवर आधारीत तयार करण्यात येणार असून चुकीची माहीती भरल्यास निकालामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.अर्ज बिनचुक भरण्याची संपुर्ण जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील.

उमेदवाराने अर्ज ऑनलाईन भरतांना चुकीची माहीती भरल्यामुळे (उदा.उमेदवाराची जात,उमेदवारांचे लिंग, इ.माहीती.) अर्जदाराची झालेली निवड रदद् करण्यात येईल.याबाबत कोणताही अर्ज अथवा प्रतिवेदन विचारात घेतले जाणार नाही.

५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमदेवाराजवळ स्वत:चा अद्ययावत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र व सही स्कॅन करुन www.msrtcexam.in या संकेतस्थळावरील सूचनेनुसार अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करतांना आकाराचे छायाचित्र ५ के.बी. ते १०० के.बी. व सहीची साईज ५ के.बी. ते ५० के.बी. असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांनी परिक्षेच्या दिवशी छायाचित्र असलेले अधिकृत ओळखपत्र, उदा.आधारकार्ड, पॅनकार्ड, वाहन चालन परवाना, पारपत्र इत्यादी सोबत आणणे आवश्यक आहे.

६) उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन मूळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच पात्र उमदेवारांची मुलाखत घेण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यास प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार रा.प.महामंडळाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमदेवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

७) अ) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याच्या सविस्तर सूचना महामंडळाच्या www.msrtc.gov.in व www.msrtcexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. उमेदवाराने www.msrtcexam.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्जातील प्राथमिक माहिती भरल्यानंतर उमेदवारास Application ID सह स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत फी भरण्याचे चलन तीन प्रतींमध्ये (उमेदवाराची प्रत, बॅंकेची प्रत आणि रा.प.महामंडळाची प्रत) उपलब्ध होईल.

ब) सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेली फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरणा करावी व सदर शाखेकडून चलनावर रक्कम जमा झालेबाबत Transaction ID नमूद केला जाईल. चलनाच्या तीन प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व रा.प.महामंडळाची प्रत शाखेकडून परत देण्यात येईल.

क) स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये भरती प्रक्रिया शुल्क जमा केले म्हणजे लेखी परीक्षेसाठी अर्ज पात्र ठरला असे गृहीत धरण्यात येऊ नये. त्यानंतर उमेदवाराने त्याला मिळालेल्या Application ID वरुन आपला प्राथमिक अर्ज पुन्हा उघडून अर्जातील उर्वरित माहिती तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाचे शाखेकडून देण्यात आलेला Transaction ID नमूद करुन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

ड)उमेदवाराने सदर अर्जाची प्रिंट व चलन भरल्याची रा.प.महामंडळाची प्रत कागदपत्र छाननीचे वेळी रा.प.महामंडळाकडे जमा करणे बंधनकारक आहे. सदर अर्जाची व चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवारांची कागदपत्रे छाननी केली जाणार नाहीत.

८) उमेदवाराने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरल्यानंतर त्या अर्जाची स्थिती www.msrtcexam.in वर पाहता येऊ शकेल.

९) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित भरती प्रक्रिया शुल्क भरलेल्या उमेदवाराच्या अर्जाची स्थिती/ परीक्षा प्रवेशपत्र/ वेळापत्रक/ परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इत्यादीबाबतची माहिती तसेच उपरोक्त निकषांनुसार प्राथमिक छाननीसाठी (कागदपत्र पडताळणी) पात्र ठरलेल्या व त्यानंतर प्राथमिक छाननीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची माहीती इ. बाबतची माहिती वर दिलेल्या संकेत स्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लघुसंदेश (एसएमएस) / ई-मेलद्वारे सूचित करण्यात येईल. अन्य कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१०) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर www.msrtcexam.in या संकेतस्थळावरुन परिक्षेचे प्रवेशपत्र विहित कालावधीत डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाद्वारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परिक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

११) उमेदवाराच्या मदत व माहितीकरिता संस्थेचा टोल फ्रि क्रमांक १८००१२१८४१४ या प्रमाणे आहे. सदर टोल फ्रि क्रमांक हा कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

१२) उमेदवाराने अर्जासोबत कुटुंबाची माहिती भरणे अनिवार्य राहील.

## (९) महत्वाच्या सूचना :---

**१.** i) रा.प.महामंडळ कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे किंवा नवीन केंद्राचा समावेश करणे याबाबतचा हक्क राखून ठेवत आहे.

ii) ऑनलाईन परीक्षा व शारिरीक क्षमता चाचणी प्रक्रिये दरम्यान उमेदवारास शारीरिक दुखापत झाल्यास किंवा कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस, रा.प.महामंडळ जबाबदार राहणार नाही.

२. सांकेतांक क्रमांक १ ते ६ या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची ऑन लाईन परीक्षा ही अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या केवळ गुणांच्या आधारे उमेदवारांला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑन लाईन अर्जात गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्रांच्या छाननी नंतरच उमेदवारांची निवड गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण विचारात घेऊन निश्चित करण्यात येईल.

३. उमेदवार अर्ज केलेल्या पदासाठीची विहित अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत नसल्याचे आढळून आल्यास त्याचा/ तिचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल.

४. ‘‘जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र‘‘ या कार्यालयात नांव नोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

५. निवड झालेले उमेदवार कागदपत्र पडताळणी तसेच शारिरीक पात्रता, शारिरीक क्षमता चाचणीमध्ये अपात्र ठरल्यास त्यांची नांवे निवड यादीतून कमी करण्यात येतील.

६. शासकीय,निमशासकीय,शासकीय उपक्रम तसेच रा.प.महामंडळाच्या सेवेतील कर्मचा-याने वर नमूद केलेल्या पदाकरीता अर्ज केला असेल, तर सदर कर्मचा-याला खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate)अंतीम निवडपूर्व कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. **रा.प.महामंडळातील अधिकारी समकक्ष पदासाठी अर्ज करू शकणार नाही. रा.प.महामंडळातील कर्मचा-याची सांकेतांक क्र.१ ते ६ या पदासाठी निवड व नेमणूक झाल्यास त्याचे रा.प.नियमानुसार वेतन संरक्षित करण्यात येईल.**

७. संकेतांक क्र.१ ते ६ या पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व ऑनलाईन परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणा-या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती www.msrtcexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

८. उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी / भरती प्रक्रिया शुल्क भरण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे किंवा परीक्षा देण्यासाठी तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची

उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

९. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. परीक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी (Mobile)अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

१०. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रि.युसे-२, दि.३.४.२००५ मधील गट-ब करिता विहीत केलेली अर्हता लागू राहील तसेच तरतुदीनुसार गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्याची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

११. विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या - त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास आंतर परिवर्तनीय ठरविण्याबाबत शासनाचे प्रचलित आदेश लागू रहातील.

१२. अ) इमाव, विमाप्र, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड सा. व शैक्ष. (एसईबीसी) या मागास प्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट)मुलाखतीचे वेळी मुळ कागदपत्र पडताळणी करताना वैध (Valid) असलेले सादर करणे आवश्यक आहे.

ब) भज-क, भज-ड व विमाप्र, इमाव, सा. व शैक्ष. (एसईबीसी) या प्रवर्गातील उमेदवारांना आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के महिला आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले वैध (Valid) प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट)मुलाखीचे वेळी मुळ कागदपत्र पडताळणी करताना सादर करणे आवश्यक आहे.

क) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असुन, ते त्या-त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ड) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्यासंबधी शासनाचे प्रचलित आदेश लागू राहतील. तसेच सदर प्रमाणपत्र मूळ कागदपत्र, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

इ) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या आरक्षणाच्या लाभ घेण्यासाठी अर्जदारांच्या / उमेदवारांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८ लाखाच्या आत असेल त्या अर्जदारास / उमेदवारास आर्थिकदृष्टया दुर्बल समजण्यात येईल व या आरक्षणाच्या लाभासाठी तो पात्र राहील. यासाठी शासन निर्णय सा.प्र.वि.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६ -अ, दि.१२.०२.२०१९ मध्ये विहीत केल्यानुसार उमेदवारास कागदपत्र तपासणीच्या वेळी सक्षम प्राधिका-याचे पात्रता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मकशि-१००७/प्र.क्र./३६/का.३६ दिनांक १०.०७.२००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवार जे बेळगाव, कारवार व बिदर जिल्हयातील अधिसूचित ८६५ गावातील रहिवाशी असतील व तसा सक्षम प्राधिका-याने वास्तव्याचा विहित नमुन्यातील दिलेला दाखला त्यांच्याकडे उपलब्ध असल्यास अशा उमेदवारांनी अर्ज करतेवेळी त्यांचा जिल्हा 'कोल्हापूर' दर्शवून त्यांचा बेळगांव, कारवार व बिदर जिल्हयातील मुळ पत्ता दर्शवावा. जर उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड झाल्यास रा.प.महामंडळातील सेवेतील नेमणूकीस पात्र राहतील. सदर उमेदवारास सेवा प्रवेश नियमातील इतर सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१४. मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर निवड झालेल्या उमेदवारांना शासन निर्णय बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब सामान्य प्रशासन विभाग दिनांक १२ डिसेंबर,२०११ नुसार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे संबंधीत उमेदवारावर बंधनकारक असेल.

१५. ऑनलाईन परीक्षेतील गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना मुलाखतीच्यावेळी कागदपत्र / शारिरीक अर्हता तपासणी करतांना, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, समांतर आरक्षणासंबंधी, शासकीय सेवेतील उमेदवारासाठी नियुक्ती प्राधिका-याचे ना हरकत प्रमाणपत्र, लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र व विहीत नमुन्यामधील अनुभवाचा दाखला तसेच मागासवर्ग जाती प्रमाणपत्र इत्यादी संबधित पदाच्या अर्हतेनुसार जे जे उमेदवारास लागू होते त्याबाबतच्या दाखल्यांच्या मूळ व स्वयं साक्षांकित प्रती (Self Attested copies)प्राथमिक छाननीच्यावेळी सादर करणे बंधनकारक असेल.

१६. निवड झालेल्या उमेदवारांना रा.प.महामंडळाच्या आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार नेमणूक देण्यात येईल.

१७. सांकेतांक क्र.१ ते ६ पदाच्या ऑनलाईन परीक्षा झाल्यानंतर प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका संकेत स्थळावर जाहीर करण्यात येईल. याबाबत उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळावर तपासणी करणे आवश्यक आहे. उत्तरतालिकेसंदर्भात काही आक्षेप असल्यास त्याबाबत संकेतस्थळावर विहीत कालावधीमध्ये बाहय संस्थेमार्फत त्याचे निरसन करण्यात येईल.विहीत कालावधीनंतर संकेतस्थाळावर अथवा लेखी स्वरूपात आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१८. सदर भरती प्रक्रिया पूर्णत: वा अंशत: रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

१९. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता खालील सूचनांचे पालन करावे.
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सरळसेवा भरती प्रक्रियेसाठी खाली नमूद केलेले प्रमुख टप्पे आहेत.

१) प्राथमिक माहिती नोंदविणे.

- २) मुख्यपृष्ठ
- ३) प्रोफाईल
- ४) अर्ज भरा.
- ५) वैयक्तिक माहिती.
- ६) इतर माहिती
  - १) छायाचित्र व स्वाक्षरी
  - २) पुष्टीकरण ( Confirmation )
  - ३) फि भरणा ( Payment of fee)
    - १) बँक चलन प्रिंट करणे.
    - २) स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत शुल्क भरुन ( Transaction ID ) मिळविणे.

नविन नोंदणी करण्यासाठी उमेदवाराने www.msrtcexam.in या संकेतस्थळावर क्लिक करावे. ( हे संकेतस्थळ Chrome 52 आणि वरील किंवा Mozilla Firefox 47 आणि वरील किंवा Microsoft Internet Explorer 11 आणि वरील श्रेणीमध्ये

अनुकूल आहे. आपण **Chrome, Mozilla Firefox** किंवा **Microsoft Internet Explorer** याची जूनी आवृत्ती असेल तर आपल्या ब्राऊजर श्रेणीमध्ये सुधारणा करणे आवश्यक राहील. भ्रमणध्वनी (Mobile) वरून सदर संकेतस्थळावर कोणतीही माहिती भरली जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

प्राथमिक माहिती नोंदविणे --

प्राथमिक माहिती नोंदविण्यासाठीच्या पृष्ठावर असलेले '' नविन नोंदणी करा'' हे बटण क्लिक करा. प्राथमिक माहिती नोंदणीच्या पृष्ठावर सर्व माहिती इंग्लिश कॅपिटल लेटर्समध्ये भरा. या पृष्ठावर आपल्याला संपूर्ण नांव, जन्म दिनांक, लिंग, पत्र व्यवहाराचा पूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादी माहिती भरावी लागेल. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर (Submit ) हे बटण क्लिक करा.

अर्जदाराने नोंद केलेल्या ई-मेल आयडीवर नोंदणी क्रमांक व पासवर्डचा मेसेज लगेचच येईल व आपणाला अर्जदाराच्या मुख्य पृष्ठावर नेले जाईल. प्रथमच लॉग इन केल्यावर अर्जदाराला आपला पासवर्ड नविन बदलण्यासाठी तरतूद केलेली आहे.

सूचना : अर्जदाराने एकदा रजिस्टर केलेला ई-मेल आयडी त्यांस पुन्हा बदलता येणार नाही.

उमेदवार नंतर जन्मदिनांक, अर्ज केलेले पद, जात प्रवर्ग याची माहिती एकदा नोदविल्यानंतर बदलू शकत नाही.

**<u>मुख्यपृष्ठ</u> :-**

पासवर्ड बदलल्यानंतर उमेदवाराला ''मुख्यपृष्ठ'' दिसेल.

या पृष्ठावर उमेदवाराला पदासाठी अर्ज केल्यानंतर अर्जाचा तपशिल आणि पैसे भरल्यानंतरची स्थिती याची माहिती मिळेल.

**<u>प्रोफाईल :-</u>**

या पृष्ठावर उमेदवाराला सर्व माहिती भरल्यानंतर त्याची वैयक्तिक आणि इतर माहिती याचा तपशिल मिळेल.

**<u>अर्ज भरा</u> : --**

वैयक्तिक माहिती :- या टप्प्यामध्ये उमेदवाराला उर्वरित वैयक्तिक माहिती भरणे आवश्यक राहील. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर ''Save (जतन करा ) '' हे बटण क्लिक करा.

इतर माहिती : या टप्प्यामध्ये उमेदवाराला समांतर आरक्षणाचा प्रकार व परीक्षेसाठी शहर निवडण्याची तरतूद केली आहे. उमेदवाराने नमूद केलेल्या समांतर आरक्षण गटामध्ये मोडत असल्यास योग्य ती माहिती वाचून आपले मत नोंदवावे. सर्व अनिवार्य माहिती भरल्यानंतर ''Save (जतन करा ) '' हे बटण क्लिक करा.

**<u>पदे निवडा</u>** : पद,शैक्षणिक पात्रता आणि व्यावसायिक अर्हता नोंदविणे.

या टप्प्यासाठी अर्जदाराने अर्ज करावयाचे पद, त्याची शैक्षणिक पात्रता आणि व्यावसायिक अर्हता नोंदवावी.

हा टप्पा सुरु करण्यासाठी अर्जदाराच्या मुख्य पृष्ठावरील ''पदे निवड'' या लिंकवर क्लिक करावे. पृष्ठावर डाव्या बाजूला पद दिसेल. हे पद निवडल्यावर पृष्ठावर उजव्या बाजूला शैक्षणिक अर्हता,अनुभव व इतर माहिती भरण्याचे रकाने दिसतील. आपली वयोमर्यादा जर नमूद केलेल्या पदासाठी पात्र नसल्यास आपल्याला तशी माहिती आपल्या पृष्ठावर दाखविण्यात येईल. जर आपण पदासाठी पात्र असल्यास आपणांस आपली संपूर्ण माहिती भरणे आवश्यक राहील व संपूर्ण आवश्यक माहिती भरल्यानंतर ''Save (जतन करा ) '' हे बटण क्लिक करा.

**<u>छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करणे --</u>**

या टप्प्यासाठी अर्जदाराचे सध्याचे छायाचित्र व स्वाक्षरीची इमेज उपलब्ध असणे आवश्यक आहे.

कार्यपध्दती :--

हा टप्पा सुरु करण्यासाठी अर्जदाराच्या मुख्य पृष्ठावरील ''छायचित्र आणि स्वाक्षरी'' या लिंकवर क्लिक करावे.

फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी ब्राऊज (   ) बटण क्लिक करुन इमेज निवडावी. अपलोडचे बटण क्लिक केल्यानंतर फोटो व स्वाक्षरी या पृष्ठावर दिसेल.
(परवानगी फाईल प्रकार :- ( jpg, jpeg, png ) छायाचित्राची साईज ही १ MB पेक्षा जास्त असू नये. तसेच स्वाक्षरीची साईज ही ५१२ KB पेक्षा जास्त असू नये.

**<u>पुष्टीकरण (Confirmation</u>)**

या टप्प्यामध्ये आपण नमूद केलेली माहिती पुनर्तपासणीसाठी तरतूद केलेली आहे. जर आपणांस काही बदल करावयाचा असल्यास आपण मागील टॅबवर क्लिक करुन आवश्यक तो बदल करु शकता. आपण नमूद केलेल्या माहितीची पुष्टी करण्यासाठी ''पुष्टी करा (Confirm) या बटणवर क्लिक करावे. ''पुष्टी करा (Confirm) च्या पृष्ठावरील प्रतिज्ञापत्र वाचून ते वाचले असल्यास चेक बॉक्स टिक करावा व या पृष्ठावरील ''पुष्टी करा ( Confirm ) बटणवर क्लिक करावे.

**<u>भरणा</u>** :-- अर्जासमोरील ''भरणा '' या दुव्यावर क्लिक करा. तेथे ''ऑनलाईन भरणा/ चलनाद्वारे भरणा '' असे पर्याय दिसतील. चलनाद्वारे भरणा पर्याय निवडल्यास जारी झालेल्या चलनाची प्रिंट घ्या आणि अंतिम दिनांकापुर्वी कामकाजाच्या दिवशी एस,बी.आय.च्या शाखेत शुल्क भरणा करा. २४ तासानंतर अर्जासमोरील भरणा स्थिती ''भरणा पुर्व'' म्हणून अद्यावत होईल. उमेदवार ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ''Internate Banking, Credit Card, Debit Card या पर्यायाचा वापर करु शकतो. ऑनलाईन भरणा केल्यास व्यवहार यशस्वी झाल्यावर लगेचच अद्ययावात होईल.

**<u>बँक चलन प्रिंट चलन करणे:--</u>**

बँक चलन प्रिंट करण्याआधी ''खात्री (Confirm) चा टप्पा पूर्ण करणे आवश्यक राहील. बँक चलन प्रिंट करण्यासाठी अर्जदाराने मुख्य पृष्ठावरील आपण अर्ज केलेल्या पदासमोर जाऊन पैसे भरण्याची पध्दत या कॉलममधील ''ऑफलाईन'' या लिंकवर क्लिक करावे व आपले बँक चलन A४ कागदावर प्रिंट करावे. अर्जदाराने चलन निर्मितीनंतर २ दिवसानंतर बँकेत फी जमा करावी. (ऑफलाईन पेमेंटसाठी असणारे बँक चार्जेस हे अर्जदारास भरावे लागतील.)

**<u>स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत शुल्क भरुन ट्रांजेक्शन आयडी मिळविणे :--</u>**

वर नमूद करण्यात आलेल्या चलन प्रतीचा उपयोग करुन स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये विहित शुल्क / फी चा भरणा करण्यात यावा. चलनावर निर्धारित केलेल्या जागेवर बँकेकडून ब्रँचकोड व ट्रांजेक्शन आयडी नमूद करुन घ्यावा. शुल्क / फी जमा झाल्याची नोंद महामंडळाकडे आल्यावर आपल्याला शुल्क / फी जमा झाल्याचा SMS व E-mail येईल.

**सूचना :-**

- ऑफलाईन किंवा ऑनलाईन पैसे भरण्याची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडल्यानंतर उमेदवाराने केलेल्या पदासाठी पुष्टी करण्यात येईल. त्यानंतर पदासाठी भरलेली माहिती बदलू शकत नाही.
- अर्ज फी भरल्यानंतर तीचा परतावा मिळणार नाही.

(माधव काळे)
**महाव्यवस्थापक (क.व.औ.सं.)**

महाराष्ट्र नागरी सेवा **(लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन)** नियम, २००५ नुसार

**(नमुना - अ )**

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री./श्रीमती / कुमारी ------------------------------------------------------------------------ श्री. ---------------------------------------------------------यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय -------------------- वर्षे, राहणार ---------------------------------------------------------याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी -------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ----------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्‌नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांकः- सही

**********

## रा.प.महामंडळातील अधिकारी यांचेकरीता सरळसेवा लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम

| अ. क्र. | विषय | एकूण प्रश्न संख्या | एकूण गुण | माध्यम | परिक्षेचा कालावधी | प्रश्न पत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | २५ | ५० | मराठी | ९० मिनिटे ( दीड तास) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न प्रत्येक प्रश्नास २ गुण |
| २ | इंग्रजी | २५ | ५० | इंग्रजी | | |
| ३ | सामान्यज्ञान | २५ | ५० | मराठी | | |
| ४ | बौध्दिक क्षमता चाचणी | २५ | ५० | मराठी | | |
| | एकूण | १०० | २०० | | | |

**अभ्यासक्रम**

अ) ज्या पदाकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे, अशा पदांकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील, फक्त मराठी या विषयाच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील.

### १) सामान्यज्ञान

अ) चालू घडामोडी- जागतिक तसेच भारतातील राजकीय, औद्योगिक, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व भौगोलीक क्षेत्रातील चालू घडामोडी.

ब) महाराष्ट्रातील शहरी व ग्रामिण भागातील पायाभूत सुविधांचा विकास (परिवहन, सार्वजनिक/खाजगी वाहतूक व्यवस्था,ऊर्जा, दळणवळण- टीव्ही, इन्टरनेट, पोष्ट दूरसंचार ) इ.बाबतचे ज्ञान

क) भारतीय राज्य घटना तसेच राज्य विधिमंडळाबाबतचे प्राथमिक ज्ञान

ड) महाराष्ट्राचा भूगोल - रचानात्मक विभाग, हवामान पर्जन्यमान, तपमान, नद्या, पर्वत, डोंगर ,पूल, नैसर्गिकवने, खनिजे, अक्षांश रेखांश इ.बाबतचे ज्ञान.

इ) सांस्कृतिक - महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे, यात्रा, तीर्थक्षेत्रे, कुंभमेळा, राष्ट्रीय सण मराठी कालगणना इ.बाबतचे ज्ञान

ई) महाराष्ट्रातील अर्थव्यवस्था-आधुनिकीकरण, जागतिकीकरण, अर्थव्यवस्थेसंबंधी प्रश्न जसे मंदी, बेरोजगारी, गरीबी, महागाई दुष्काळ, वाढती लोकसंख्या

उ) संगणक माहिती व तंत्रज्ञान- आधुनिक समाजातील संगणकाचा वापर, शासकीय / निम शासकीय क्षेत्रातील संगणकीकरण, शासनाचे कार्यक्रम, जसे, ई-गव्हर्नस एक खिडकी योजना,

### २) इंग्रजी-

अ) उता-यावरील प्रश्न

ब) व्याकरण

### ३) मराठी

ओ) मराठी भाषा - व्याकरणासंबंधी प्रश्न,

### ४) बौध्दिक चाचणी

अ) अंकगणित - दशांश अपूर्णांक, घातांक, वर्गमूळ, टक्केवारी, गुणोत्तर, सरासरी, कामकाळवेग,नफातोटा

ब) बौध्दिक क्षमता चाचपणी विषयक प्रश्न.